दाखल, ४५ आरोपींना अटक

महाराष्ट्र सायबर विभागाची दमदार कामगिरी

वृत्तसंस्था

मुंबई दि. १६ – कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊनचा राज्यामध्ये काही गुन्हेगार व समाजकंटक गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्र सायबर विभागाने त्यांच्याविरुद्ध कडक पावले उचलली असून राज्यात २१८ गुन्हे दाखल झाले असून ४५ आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र सायबर विभागाने दिली आहे.

टिकटॉक, फेसबुक, ट्विटर व अन्य समाजमाध्यमांवरून चालणाऱ्या गैरफायदासंदर्भात राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये २१८ गुन्ह्यांची नोंद झाली असून त्यांपैकी ८ गुन्हे अदखलपात्र आहेत. त्यामध्ये बीडमधील २६, कोल्हापूर व पुणे ग्रामीणमधील प्रत्येकी १५, अहमदनगर १३, मुंबईतील १२, सांगलीतील १०, जालना व नाशिक ग्रामीण भागातील प्रत्येकी ९, साताऱ्यामधील ८, नंदेड, परभणी व नाशिक शहरातील प्रत्येकी ७, ठाणे शहरामधील ६, नागपूर शहर, सिंधुदुर्ग, वर्धा मुंबई, सोलापूर ग्रामीणमधील प्रत्येकी ५, बुलढाणा, पुणे शहर, नांदूर, गोंदिया येथील प्रत्येकी ४, सोलापूर शहरातील ३, रायगड व उस्मानाबादमधील प्रत्येकी २, आणि ठाणे ग्रामीण व पुढे येथील प्रत्येकी एका गुन्ह्याचा प्रामुख्याने समावेश आहे. या गुन्ह्यांत आक्षेपार्ह व्हाट्सॲप संदेश फॉरवर्ड केल्याप्रकरणी १०२ गुन्हे, आक्षेपार्ह फेसबुक पोस्टचा शेअर केल्याप्रकरणी ७१ गुन्हे, टिकटॉकवर व्हीडिओ शेअरप्रकरणी २ गुन्हे व ट्विट्ससंदर्भात ३ गुन्हे दाखल झाले आहेत. याव्यतिरिक्त अन्य समाजमाध्यमांचा गैरवापर केल्या प्रकरणी १८ गुन्हे दाखल झाले आहेत, अशी माहिती महाराष्ट्र सायबर विभागाने दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिक ग्रामीण अंतर्गत सटाणा पोलीस स्टेशनमध्ये एका गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर आरोपीने एका टिकटॉकवर बालगीतांचे कोरोनाच्या भीतीपूर्ती मालेगावमधील लोकांचे लॉर्व सटाणाच वेगार अशा आशयाची भाषणे व्हाट्सॲप व अन्य समाजमाध्यमांवर प्रसारित विषयाचा दुरुपयोग केला आहे. महाराष्ट्र सायबर विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे. त्यामध्ये कोणताही समाजाचे भावना दुखावतील अशा पोस्ट शेअर करू नयेत. कुठेही अशा पोस्ट आढळल्या तर त्याबाबत आपल्या प्रतिक्रिया चिंतावणीखोर वक्तव्याची खाली करा व आपल्या प्रतिक्रियेचा विषयाचा दुरुपयोग करणाऱ्या कोणत्याही समाजाचे किंवा सरकारी अधिकाऱ्याचे उल्लेख होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे महाराष्ट्र सायबर विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे. त्याचप्रमाणे कोणीही अफवा व चुकीच्या बातम्या कोणत्याही समाजमाध्यमांद्वारे पसरवू नयेत. तसेच त्यांच्याकडे विश्वासही ठेवू नये. काही मदत लागल्यास जवळच्या पोलीस स्टेशनला संपर्क साधावा, असेही आवाहन पोलिसांनी केले आहे. दरम्यान, केंद्र व राज्य सरकार वेळोवेळी नव्या नियमावली प्रसारित करत आहेत त्यांचे लोकांनी पालन करून पोलीस बंधांचे व कारण सरल्याच पाऱ्याच बाहेर पडू नये, अशीही आवाहन महाराष्ट्र सायबर विभागामार्फत करण्यात आले आहे.

कर्जतच्या गुडवण गावातील संतापजनक प्रकार

वार्ताहर

कर्जत, दि. १६ – तालुक्यातील गुडवणवाडीमधील आठ आदिवासी रोजगाराच्या मोहापोटी आठ आदिवासी हे रेशन घेण्यासाठी १६ एप्रिलला सकाळी रेशन दुकानात बसलेले होते. त्यांचेही रेशन दुकानदार जयदीप कांडू यांनी गुडवणवाडीमधील आठ आदिवासी लोकांची रेशनिंग कार्डे काढून टाकली. त्यामुळे त्या आदिवासी लोकांना काय मुद्दा आहे हे कळले नाही आणि आपली काहीतरी चिन कार्डे काढून त्यांना घ्यावा बसला. या घटनेने मेहेलुला आदिवासी ग्रामस्थांनी ही बाब कर्जत पंचायत समिती सदस्य जयश्री हिंदोला यांना सांगितली. हिंदोला यांनीही तातडीने सदर बाब गुडवणवाडीमधील आठ आदिवासी यांना सोबत घेवून तहसीलदार व तेथे ग्रामस्थांना न्याय देण्याचा विनंती केली.

दरम्यान, गुडवणवाडी येथील गोठी पोटू पारधी, पंढरीनाथ सखाराम पारधी, बाळू मारुती निगुडा, आत्माराम सखाराम पारधी, नारायण सखाराम पारधी, हरिचंद्र काळू नागुडा, सखाराम देवू सखाराम, शंकर मधुराम सखाराम या आदिवासी बांधवांची रेशनकार्डे काढली गेली आहेत. त्यामुळे त्यांना धान्य मिळण्याची शक्यता नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सव्वाबारा लाख रुपयांच्या मास्कसह व्यापाऱ्याला अटक

प्रतिनिधी

मुंबई, गुरुवार – कोरोनाने सर्वत्र हाहाकार माजवला असतानाच कोरोनाचा कैताळ रोखण्यासाठी अत्यावश्यक असलेला मास्कचा साठा करून तो नंतर जास्त दाने विकण्याच्या अनेक घटना मुंबईत उघडकीस येत आहेत. यातील एकाच्या पहाडीच्या एका घटनेत मुलगे सव्वाबारा लाख रुपयांचा मास्कसह मोहम्मद नौशाद मोहम्मद कलाम शेख या व्यापाऱ्याला मंगळवारी मुंबई पोलीस अधिकाऱ्यांनी ट्रॉम्बे कॅम्प, रोड क्रमांक ३ मध्ये छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी ८१ नग ब्री प्लाय सर्जिकल मास्कचा साठा जप्त केला आहे. या मास्कची किंमत सुमारे सव्वाबारा लाख रुपये आहे. या मास्कचा साठा करून त्यांची दुप्पट भावात विक्री होत होती. त्यामुळे मोहम्मद नौशाद शेख या व्यापाऱ्याला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला धारावी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या तो सध्या पोलीस कोठडीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मास्क आणि सॅनिटायझरची अत्यंत मदत होत आहे. तथापि, याच गोष्टीचा काळाबाजार करण्याचाच मुंबई पोलिसांनी विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमे अंतर्गत धारावी परिसरात काहीजण मास्कचा काळाबाजार करत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक विनोद साळवे यांना मिळाली. या माहितीनंतर प्रभारी पोलीस निरीक्षक विनोद साळवे यांच्या पथकाने धारावीतील ट्रॉम्बे कॅम्प, रोड क्रमांक ३ मध्ये छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी ८१ नग ब्री प्लाय सर्जिकल मास्कचा साठा जप्त केला आहे. या मास्कची किंमत सुमारे सव्वाबारा लाख रुपये आहे. या

Reliance
Reliance Infrastructure Limited

नोंदणीकृत कार्यालय: एच के एन इन्फ्रास्ट्रक्चर हाऊस, भक्ती मार्ग, ग्रा. मरोळ, ता. अंधेरी पिनकोड, एस. व्ही. जी रोडच्या पश्चिमेकडे बाजू, मरोळ विमान तळ, मुंबई - ४०० ०५९
दूरध्वनी: +९१-२२४२ ६२०० फॅक्स: +९१-२२४२ ६२०१ ई-मेल: investor_relations@rel.in
CIN: L35100MH1985PLC034979

सूचना

रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड (पूर्वीची रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड) (पूर्वीची रिलायन्स पॉवर लिमिटेड) (पूर्वीची रिलायन्स एनर्जी लिमिटेड) (कंपनी) कंपनीच्या संचालक मंडळाची दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजीच्या बैठकीत कंपनीच्या सदस्यांच्या/कर्जदारांच्या संबंधात विचारात घेण्यासाठी विचार करण्यासाठी आणि त्याच दिवशी घेण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे, संचालक मंडळाच्या ठरावाच्या माध्यमाद्वारे कंपनीच्या सदस्यांच्या मान्यतेसाठी, सदर ठरावाच्या मजकूराच्या संबंधात